# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.04.2025** **वार-बुधवार**

---

**पहलगामहल्ला**

जम्मू-कश्मीरमधील पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या राज्यातल्या सहा पर्यटकांचे पार्थिव देह राज्यात विविध ठिकाणी आणण्यासाठी महाराष्ट्र सदन कार्यरत आहे. मृतांपैकी चार जणांचे पार्थिव देह मुंबईला, तर दोन जणांचे पार्थिव देह पुण्याला दिल्लीमार्गे पाठवण्यात येणार आहेत. पार्थिवांबरोबर असलेल्या नातेवाईकांशी महाराष्ट्र सदनाच्या राजशिष्टाचार विभागातील अधिकारी सतत संपर्कात आहेत.

दरम्यान, पुण्यातील संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे या मृत पर्यटकांचं पार्थिव आज रात्री साडेअकराच्या सुमारास विमानाने पुण्यात आणण्यात येईल, असं केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं. पुण्यातील सुमारे दीडशे ते पावणेदोनशे नागरिकांचा एक गट काश्मीरमध्ये अडकलेला आहे. या लोकांना परत आणण्यासाठी विशेष विमानाची व्यवस्था करण्यात येणार आहे. काश्मीरमध्ये अडकलेल्या सर्व नागरिकांना लवकरात लवकर सुरक्षितपणे परत आणण्याचे प्रयत्न सुरू असून कुणीही घाबरून जाऊ नये, असं आवाहन मोहोळ यांनी केलं आहे. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांचा ०२०- २६१२३३७१ हा हेल्पलाइन क्रमांकही जारी करण्यात आला आहे. क्रमांक पुन्हा एकदा ऐका... ०२०- २६१२३३७१

**<u>एएफएमसी</u>**

सीमा भागातील लष्करी वैद्यकीय रुग्णालयं अद्ययावत करण्यात येत असून श्रीनगरमधील लष्करी रुग्णालय उत्कृष्ट सेवा देत आहे, अशी माहिती लष्करी वैद्यकीय सेवा विभागाच्या महासंचालक व्हाइस ॲडमिरल आरती सरीन यांनी आज पुण्यात पत्रकारांशी बोलताना दिली.

तत्पूर्वी, पुण्यातील लष्करी वैद्यकीय महाविद्यालयाच्या ५९व्या तुकडीचा दिमाखदार दीक्षांत संचलन सोहळा आज पार पडला. या संचलन सोहळ्यात वैद्यकीय सेवेचे १२१ छात्र सहभागी झाले होते. यामधील ९५ लष्करात, ११ नौदलात आणि १५ हवाई दलात दाखल होणार आहेत. या संचलनाचं नेतृत्व सौरभ सिंग यादव याने केलं. "देशाला सर्वोच्च प्राधान्य देऊन जबाबदारी आणि निष्ठेने काम करावं" , असं आवाहन व्हाइस ॲडमिरल आरती सरीन यांनी संचलन सोहळ्याला संबोधित करताना केलं.

**<u>मोहोळ</u>**

मोठ्या सहकारी बँकांनी लहान बँकांना मदतीचा हात द्यावा याकरिता केंद्र सरकारच्या मदतीनं सहकारी बँकांसाठी स्वतंत्र राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळ स्थापन करण्यात आलं आहे, त्याचा जास्तीत जास्त फायदा छोट्या सहकारी बँकांनी करुन घ्यावा, असं आवाहन केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात केलं. वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेत झालेल्या प्रमुख सहकारी बँकांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी महामंडळाचे अध्यक्ष ज्योतिंद्रभाई मेहता, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभात चतुर्वेदी, सहकार आयुक्त दीपक तावरे, रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे आणि सहकारी बँकांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महापालिकेतर्फे येत्या १ मे पासून २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मिळकत करांच्या देयकांचं वाटप केलं जाणार आहे. ३० जूनपर्यंत बिल भरणाऱ्या  मिळकतधारकांना सर्वसाधारण करामध्ये पाच टक्के सवलत देण्यात येणार आहे.

**<u>पावसाळापूर्वकामे</u>**

पुणे शहरांत पावसाळ्यात पाणी साठून राहणाऱ्या २०१ ठिकाणी उपाययोजना करण्याचं काम महापालिकेतर्फे सुरू आहे. मे महिन्याच्या अखेरपर्यंत ती कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या संदर्भात अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी आज आढावा बैठक घेतली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पाणी साचणाऱ्या १२ ठिकाणी पावसाळी लाईन टाकणार असून, २१ ठिकाणची कामे तातडीने केली जाणार आहेत. काही कामे करण्यासाठी वाहतूक पोलिसांची परवानगी मिळावी, यासाठी संयुक्त बैठकही आयोजित केली जाणार आहे, असं पृथ्वीराज बीपी यांनी सांगितलं.

**<u>क्रीडा</u>**

विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील करिअरच्या संधी, खेळाडूंचं शारीरिक आणि मानसिक आरोग्य, क्रीडा शिष्यवृत्ती, खेळाडूंचे आहार, क्रीडा माध्यमातून नेतृत्व, वेळेचे व्यवस्थापन इत्यादी बाबत माहिती व्हावी यासाठी येत्या २६ आणि २७ एप्रिल  रोजी पुण्यात दोन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेमध्ये अनेक दिग्गज आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. विविध शाळांमधील शंभरहून अधिक विद्यार्थी, त्यांचे शिक्षक आणि पालक या कार्यशाळेला उपस्थित राहणार आहेत. रोटरी युथ लीडरशिप अवॉर्ड्स या उपक्रमाअंतर्गत आयोजित या कार्यशाळेचं उद्घाटन ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>टेनिस</u>**

पुण्यामध्ये सोळा वर्षांखालील गटाची अखिल भारतीय मानांकन टेनिस स्पर्धा सुरू आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंची विजयी घोडदौड कायम आहे. मुलांच्या गटात अथर्व शुक्ला याने पश्चिम बंगालच्या संकल्प सहानीचा पराभव करत धक्कादायक निकालाची नोंद केली. वरद पोळ, शिवराज भोसले, आरव पटेल यांनी तिसरी फेरी तर मुलींच्या गटात इरा त्रिपाठी आयुशी तरंगे, विरा हरपुडे यांनी दुसरी फेरी गाठली.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ४० तर किमान तापमान २३ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही कमाल तापमान साधारण असंच असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**